महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
मुंबई विभागीय मंडळ, वाशी, नवी मुंबई – ४०० ७०३.
M. S. Board Of Secondary And Higher Secondary Education,
Mumbai Divisional Board, Vashi, Navi Mumbai-400 703.

क्र. मुंविमं/केंनि/सन 2025 / 3900
वाशी,नवी मुंबई-400 703
दिनांक : 04/10/2025

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य (केंद्रसंचालक)
मुंबई विभागीय मंडळाच्या कार्यक्षेत्रातील
सर्व परीक्षा केंद्र शाळा / कनिष्ठ महाविद्यालय.

विषय : माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी.) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. 12 वी.) परीक्षा केंद्रावरील भौतिक सुविधेबावत तसेच परीक्षा केंद्रावर सी.सी.टी.व्ही. यंत्रणा बसविण्याबावत...

संदर्भ : १. क्र.रा.मं./परीक्षा-८/३२६९ पुणे यांचे दि. २५.०९.२०२५ रोजीचे पत्र.
२. क्र.रा.मं./ परीक्षा-८/३०१७ पुणे यांचे दि. २९.०९.२०२५ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, फेब्रु-मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ. १२ वी) परीक्षेसाठी सर्व परीक्षा केंद्रावर खालील प्रमाणे भौतिक सुविधा उपलब्ध असाव्यात.

१. परीक्षा केंद्र परिसरात व परीक्षेशी संबधित सर्व वर्ग खोल्यांमध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरे असणे अत्यावश्यक आहे.
२. परीक्षा केंद्राच्या सर्व बाजूने पक्की संरक्षक भिंत (Wall compound) असावी.
३. प्रत्येक परीक्षार्थ्यांस एक याप्रमाणे केंद्रावर समाविष्ट विद्यार्थी संख्येनुसार पुरेसे बाक (Bench) / फर्निचर सुस्थितीत असावे.
४. परीक्षा केंद्राच्या इमारतीच्या खिडक्यांना पक्क्या जाळ्या असाव्यात.
५. परीक्षा केंद्रावर मुलामुलींसाठी स्वतंत्र, पक्की व विद्यार्थी संख्येनुसार पुरेशी स्वच्छतागृहे / प्रसाधनगृहे असावीत. सदर स्वच्छतागृहात मुबलक पाणी पुरवठा असावा.

याबाबत सुचित करण्यात येते की, सद्यास्थितीत अस्तित्वात असलेल्या सर्व परीक्षा केंद्रावर वरीलप्रमाणे भौतिक सुविधा असणे अनिवार्य आहे. तरी सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य तथा केंद्रसंचालकांनी सर्व भौतिक सुविधा आपल्या परीक्षा केंद्रावर उपलब्ध करून घ्याव्यात व उपलब्धता प्रमाणपत्र तात्काळ मंडळ कार्यालयास सादर करावे.

(ज्योत्स्ना शिंदे-पवार)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, मुंबई विभागीय मंडळ,
वाशी, नवी मुंबई-४०० ७०३

प्रत माहितीस्तव-
1. मा. सचिव, राज्य मंडळ, पुणे
2. शिक्षण उपसंचालक, मुंबई विभाग मुंबई

प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव-
1. शिक्षणाधिकारी माध्य जि. प ठाणे/रायगड/पालघर
2. शिक्षण निरीक्षक (दक्षिण/पश्चिम/उत्तर विभाग)